**।। ॐ नम शिवाय ।।**

बाजार मुल्यांकन दर रूपये ३०,३००=०० प्र.चौ.मी.
रेडी रेकनर चार्ट नंबर १.३.१२

| | | |
|---|---|---|
| एकूण कार्पेट क्षेत्रफळ | : | ______ चौ. मी. |
| बाजार मुल्यांकन रूपये | : | |
| आपसातील किंमत रूपये | : | |
| मुद्रांक शुल्क रूपये | : | |
| नोंदणी फी रूपये | : | |

# ॲलोटमेंट करारनामा

**ॲलोटमेंट करारनामा करारनामा आज दिनांक माहे ______ सन ____________ रोज ते दिवशी नाशिक मुक्कामी.......**

:
वय : वर्षे, व्यवसाय : नोकरी : **लिहून घेणार**
पॅन नंबर :
राहणार : :
:

**-: यांसी :-**

**बद्रीनाथ हाईटस् को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक तिचा नोंदणी क्रमांक एन. एस. के./ एन. एस. के. /एच. एस. जी. / टी. सी. ५६८६/२०१७ दिनांक १७/०४/२०१७ तर्फे चेअरमन श्री. राजेशकुमार मोती गुप्ता** : **लिहून देणार**
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : व्यापार :
राहणार : रेणूका अपार्टमेंट, पांडवनगरी, पाथर्डीरोड, नाशिक. :
पॅन नंबर अे अे ई अे बी ०१८० बी :

**कारणे ॲलोटमेंट करारनामा लिहून देतात ऐसा जे की,**

प्रस्तुतचे दस्ताचे अखेरीस नमूद **परिशिष्ट -१ मध्ये** सविस्तर नमूद केलेल्या **मौजे नाशिक ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर ९८४/ १ब /२ प्लॉट क्रमांक १७/१८ यांसी क्षेत्रफळ ३५६.८८ चौ. मी. यापैकी कॉलनीरोड रूंदीकरणाचे क्षेत्र १३.५२ चौ. मी. वजा झाले नंतर शिल्लक क्षेत्र ३४३.३६ चौ. मी.** या मिळकतीचे मालक लिहून देणार असून मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटस्ला सरकार दप्तरी लिहून देणार यांचे नांव मालक व कब्जेदार सदरी दाखल आहे.

**( सदरहू जमीन मिळकतीचा उल्लेख सदरचे दस्तात यापुढे सदरची जमीन मिळकत /सदरहू जमीन मिळकत असा केलेला आहे, लिहून देणार यांचा उल्लेख आम्ही, लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही, तसेच परिशिष्ट -२ मधील मिळकतीचा उल्लेख सदर फ्लॅट मिळकत असा संक्षिप्ततेसाठी केलेला आहे.**

**सदरहू लिहून देणार यांचे मिळकतीवरील हक्काचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

सदर परिशिष्ट -१ मध्ये नमूद केलेली मिळकत लिहून देणार यांचे स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची आहे. सदर मिळकती पैकी प्लॉट क्रमाकं १७ ही मिळकत लिहून देणार यांनी **सौ. दिपाली प्रविण नागरे यांचे पासून व प्लॉट क्रमांक १८ ही मिळकत श्री. कचरू बबन हुळहुळे यांचे पासून दिनांक ०८/०६/२०१७ रोजी** कायम फरोक्त खरेदीखताने खरेदी केलेली आहे. सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साो., नाशिक -५ यांचे कार्यालयात अनुक्रमे **दस्त क्रमांक २८९७ व २८९६ अन्वये दिनांक ०८/०६/२०१७ रोजी** नोंदविण्यात आलेले आहे. सदरच्या खरेदीखताने सदर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटसला अनुक्रमे **नोंद क्रमांक ५००१८८ व ५००१८९ अन्वये** लिहून देणार यांचे नांव मालकी हक्कात दाखल झालेले आहे.

त्यानंतर सदरच्या प्लॉट क्रमांक १७ व १८ ह्या मिळकती एकत्र केलेल्या असून त्यासंदर्भात महानगर पालीका नाशिक यांचे कडील पत्र क्रमांक पाथर्डी/ अभिन्यास / भुखंड एकत्रीकरण/ ससंनर/ मनपा/ एलएनडी / अेएमएल/ नाशिक / डीसीआर/ ००५५/ २०१८ दिनांक १२/०७/२०१८ रोजी एकत्रीकरणाची परवानगी घेतलेली आहे. त्यानंतर सदरच्या प्लॉट क्रमांक १७ + १८ ह्या मिळकतीचा ७/१२ उतारा एकत्र झालेला असून त्यासंदर्भात नोंद क्रमांक ५००७८५ अन्वये मंजूर झालेली आहे.

त्यानंतर सदरच्या कलम १ मधील मिळकतीतून मनपा व शासनाच्या नियमानुसार रस्ता रूंदीकरणाचे क्षेत्र १३.५२ चौ. मी. एवढे वजावट झालेले असून त्यासंदर्भात नोंद क्रमांक ५००८३५ अन्वये मंजूर होवून १३.५२ चौ. मी. एवढ्या क्षेत्रासाठी महानगर पालीका नाशिक यांचे नांव नांव मालकी हक्कात दाखल झालेले आहे व लिहून देणार संस्थेचे ३४३.३६ चौ. मी. एवढे क्षेत्र शिल्लक राहिलेले आहे.

तदनंतर लिहून देणार यांनी वर प्लॉट मिळकतीवर इमारत नकाशा बनविलेला असून सदरचा नकाशा नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी **कमेन्समेंट सर्टिफिकेट क्रमांक एल. एन. डी. / बी. पी. /नाशिक / डीसीआर/ ११४३/ २०१९ दिनांक ०४/०६ /२०१९ रोजी** मंजूर केलेला आहे.

तदनंतर परिशिष्ट - १ यात वर्णन केलेल्या मिळकती साठी **टि. डि. आर. क्षेत्र ७०.०० चौ. मी. एवढे क्षेत्र सर्टिफिकेट क्रमांक ७५१ मधील श्री. दिलीप सहादू जाधव व इतर यांचे तर्फे जनरल मुखत्यार धारक श्री. दिलीप दत्तु दातीर यांचे पासून खरेदी केलेले असून सदर खरेदीखत दिनांक ०८/१०/२०१८ रोजी दस्त क्रमांक ४६९० अन्वये नोंदविण्यात आलेले आहे**

अशाप्रकारे लिहून देणार हे सदर जमीन मिळकतीचे मालक झालेले आहेत व सदरहू जमीन मिळकत विकसीत करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांना प्राप्त झालेले आहेत.

सदरहू जमीन मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असून लिहून देणार यांचे मिळकतीवरील स्वामीत्वास /टायटलला आजमितीस कोणतीही बाधा नाही.

तसेच जमीन मिळकतीस अगर त्यावरील प्रकल्पास आजमितीस कोणतेही अडथळे अगर हरकती नाहीत.

तसेच सदरहू जमीन मिळकतीवर कोणतेही अतिक्रमण नाही.

तसेच सदरहू जमीन मिळकत आजमितीस कोठेही गहाण नाही अगर मिळकतीवर कोणत्याही वित्तीय संस्थेचा अगर बँकेचा बोजा नाही.

तसेच लिहून देणार यांना सदरहू मिळकतीवर प्रकल्प राबविण्याचा , बांधकाम करून बांधीव भाग विक्री करण्याचा तसेच खरेदीदारांकडून रक्कमा स्विकारण्याचा , खरेदीदारांचे लाभात विविध दस्तऐवज लिहून देण्याचा संपूर्ण हक्क लिहून देणार यांना प्राप्त आहे.

सदरहू जमीन मिळकत ही लिहून देणार यांचे कब्जात, उपभोगात व कब्जे वहिवाटीत आहे.

आणि ज्याअर्थी , लिहून देणार यांनी सदरहू जमीन मिळकतीवर बांधकाम करण्याचे / प्रकल्प राबविण्याचे ठरविलेले असून त्यानुसार सदरहू प्रकल्पामध्ये आजमितीस मंजूर इमारत **नकाशानुसार एकूण ०१ इमारतीचे** बांधकाम प्रस्तावित असून सदरहू इमारतीस **बद्रीनाथ हाईटस को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक** असे संबोधण्यात आलेले आहे. तसेच सदर इमारती मध्ये **तळ मजला पार्कींग + चार मजले** असे मजले आहेत, असे बांधकाम प्रस्तावित आहे. **सदर इमारत रहिवाशी वापराची असून** या शिवाय भविष्यात नाशिक महानगर पालीका नशिक यांचे नियमातील बदला मुळे चटई निर्देशांका मध्ये वाढ झाल्यास त्यानुसार प्रस्तावित बांधकामामध्ये वाढ करण्यात येईल.

लिहून घेणार यांना सदरहू प्रकल्पामधील **फ्लॅट क्रमांक मजल्या वरील** खरेदी करण्यात स्वारस्य / इच्छा असल्याने तसा प्रस्ताव लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिलेला आहे. सदर **फ्लॅट क्रमांक मजल्यावरील** यास या पुढे सदरचे दस्तात सदरची /उक्त **फ्लॅट / वेश्म** असे संबोधलेले आहे व सदर मिळकतीचे वर्णन या दस्ताचे अखेरीस नमूद **परिशिष्ट -२** मध्ये केलेले आहे.

आणि ज्याअर्थी , लिहून देणार यांनी प्रकल्पाचे व त्यामधील इमारती व इतर बांधकामाचे संदर्भाने इमारत नकाशे, आरेखने व इतर सररचनात्मक नकाशे तयार **करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञ श्री. सतिष गायकवाड यांची नेमणूक केलेली असून स्थापत्य अभियंता श्री. योगेश थत्ते** यांची नेमणूक केलेली आहे व त्यानुसार बांधकाम पूर्ण होई पर्यंत वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांच्याकडून व्यावसायीक पर्यवेक्षण करण्याचे मान्य केलेले आहे. मात्र नियुक्त वास्तुशास्त्रज्ञ व स्थापत्य अभियंता यांची नेमणूक रद्द करण्याचा तसेच त्यांचे ऐवजी दुसरे वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांची नेमणूक करण्याचा हक्क लिहून देणार यांचा अबाधित राहणार आहे.

आणि ज्याअर्थी , सदरची **फ्लॅट / वेश्म** मिळकत विक्री करण्याचा लिहून देणार यांना एकट्यास संपूर्ण हक्क व अधिकार आहे.

आणि ज्या अर्थी , सदरचे जमीन मिळकती संदर्भाने लिहून देणार यांचे मालकी हक्क दर्शविणारी व मिळकतीचे टायटल संदर्भाने असलेली संपूर्ण कागदपत्रे जसे की, ७/१२ उतारे, नोंदी, खरेदीखते व इतर दस्तऐवजे तसेच लिहून देणार यांनी नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञ आणि स्थापत्य अभियंता यांनी तयार केलेले आराखडे , इमारत नकाशे व इतर नकाशे तसेच स्थावर संपदा ( विनिमयन व विकास ) अधिनियम २०१६ यामध्ये नमूद कागदपत्रे यांच्या प्रती लिहून घेणार यांना निरीक्षणा साठी व अवलोकना कामी यापूर्वीच दिलेल्या आहेत, त्यानुसार लिहून घेणार यांनी सदरील कागदपत्रांची तपासणी लिहून घेणार यांनी केलेली असून लिहून घेणार यांची खात्री पटले नंतरच लिहून घेणार यांनी मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

आणि ज्याअर्थी , सदरहू मिळकती वरील लिहून देणार यांचा प्रस्तावित मालकी हक्काचा तपशिल दर्शविणारा व **अधिवक्त्याने / वकीलाने** प्रमाणित केलेला प्रमाणपत्रासह अहवाल तसेच मिळकत पत्रिका , ७/१२ उतारा, नोंद यांच्या महसूली अभिलेखातील प्रमाणित प्रती प्रस्तुतचे

दस्तासोबत जोडलेल्या असून त्यास अनुक्रमे **जोडपत्रे क्रमांक अे व बी** म्हणून चिन्हीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी सदरहू प्रकल्पासंदर्भाने इमारत नकाशा हा नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी मंजूर केलेला असून त्याची स्वप्रमाणित प्रत प्रस्तुतचे दस्तासोबत जोडलेली असून त्यास **जोडपत्रे क्रमांक सी** म्हणून चिन्हीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी लिहून देणार यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे इमारत नकाशा नुसार बांधकाम व उक्त प्रकल्पासाठी द्यावयाचे प्रस्तावित असलेल्या मोकळया जागा यांच्या स्वप्रमाणित प्रत प्रस्तुतचे दस्तासोबत जोडलेली असून त्यास **जोडपत्र क्रमांक डी** म्हणून चिन्हीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी मंजूर केलेल्या इमारत नकाशा मधील लिहून घेणार हे खरेदी घेत असलेल्या सदनिकेचे नकाशाची स्वप्रमाणित प्रत प्रस्तुतचे दस्तासोबत जोडलेली असून त्यास **जोडपत्र क्रमांक ई** म्हणून चिन्हीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी लिहून देणार यांनी सदरहू प्रकल्पा मधील इमारत नकाशे मंजूरी ही नाशिक महानगर पालीका नाशिक यांचे कडून मिळविलेली असून त्यानुसार उक्त इमारतीचे **बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा भोगवटप्रमाणपत्र ( कम्प्लीशन सर्टिफिकेट )** मिळविण्यासाठी लिहून देणार हे वेळोवेळी आवश्यक असेल त्याप्रमाणे विविध प्राधिकरणांकडून शिल्लक असल्यास त्या त्या मान्यता/परवानग्या मिळवतील.

आणि ज्याअर्थी उक्त नकाशे मंजूर करताना संबंधीत स्थानिक प्राधिकरणाने आणि किंवा शासनाने काही अटी व शर्ती विनीर्देश व निर्बंध निर्धारीत केले असल्यास लिहून देणार यांनी मिळकत विकसीत करताना त्यांचे पालन करण्याचे कबूल केलेले आहे व त्यानुसार उक्त इमारतीच्या संबंधातील बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व भोगवटापत्र मिळवून देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

आणि ज्याअर्थी सदरहू जमीन मिळकती संदर्भाने मिळकत बिनशेती प्रयोजनार्थ वर्ग करणेकामी **मे. जिल्हाधिकारी सो. नाशिक यांनी परवानगी/आदेश क्रमांक दिलेला असून त्याचा आदेश क्रमांक मह/कक्ष-३/ बि. शे. प. क्र. / २९२/ २००९ दिनांक १४/०६/२०१० रोजी** घेण्यात आलेला आहे. सदर आदेश हा परिशिष्ट -१ मधील मिळकतीचे पूर्वीचे मालकांनी मिळविलेले आहेत. सबब त्यासंदर्भाने लिहून देणार यांचे काही एक दायीत्व अगर जबाबदारी नाही.

आणि ज्याअर्थी सदरहू मिळकतीचा **अभिन्यास /ले-आऊट हा सहाय्यक संचालक , नगररचना विभाग, नाशिक यांनी मंजूर केलेला असून त्याचा मंजूरी क्रमांक नगररचना विभाग/ अंतिम / सीडी / बी-३/३१ दिनांक २८/०९/२०१० रोजी मंजूर झालेला आहे.**

सदर मंजूरी ही परिशिष्ट - १ मधील मिळकतीचे पूर्वीचे मालकांनी मिळविलेले आहेत. सबब त्यासंदर्भाने लिहून देणार यांचे काही एक दायीत्व अगर जबाबदारी नाही.

आणि ज्याअर्थी, लिहून देणार यांनी उक्त प्रस्तावित नकाशानुसार उक्त इमारतीचे **रहिवाशी वापराच्या** बांधकामास सुरूवात केलेली आहे.

आणि ज्या अर्थी लिहून घेणार यांना सदरहू प्रकल्पामधील **फ्लॅट / वेश्म** मिळकत म्हणजेच प्रस्तुतचे दस्ताचे अखरेदीस नमूद **परिशिष्ट – २ मध्ये** सविस्तर नमूद **फ्लॅट / वेश्म** खरेदी करण्यास स्वारस्य असल्याने तसा प्रस्ताव लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिलेला आहे.

**आणि ज्याअर्थी उक्त सदनिकेचे एकूण कार्पेट क्षेत्र चौ. मी. इतके आहे आणि कार्पेट क्षेत्र याचा अर्थ बाहेरील भिंतीनी व्यापलेले क्षेत्र, परिसेवा कुपखालील क्षेत्र, केवळ लिहून घेणार यांचे उपयोगा करीता उक्त सदनिकेस उपांगभूत असलेला सज्जा ( बाल्कनी ) किंवा व्हरांड्याचे क्षेत्र आणि केवळ लिहून घेणार यांचे उपभोगासाठी उक्त सदनिकेस उपांगभूत असलेल्या खुल्या टेरेसचे क्षेत्र वगळून परंतु सदनिकेच्या अंतर्गत भिंतीनी व्यापलेल्या क्षेत्राचा समावेश असलेले वेश्माचे निव्वळ वापर योग्य चटई क्षेत्र असा आहे.**

आणि ज्याअर्थी लिहून देणार व लिहून घेणार हे या करारामध्ये आणि सर्व लागू असणाऱ्या कायद्यामध्ये अंतर्भूत असलेल्या संपूर्ण अटी व शर्ती व करारनिविष्ट यांचे विश्वासपूर्वक पालन होण्यासाठी त्यांची परस्परांची घोषणापत्रे, अभिवेदने व आश्वासने यांवर विश्वास ठेवून , आता यात यापुढे स्पष्ट करण्यात येणाऱ्या अटी व शर्तींवर स्वेच्छेने हा करार करीत आहेत.

आणि ज्याअर्थी लिहून देणार यांनी सदर प्रकल्पाची नोंदणी स्थावर संपदा ( विनियम व विकास ) अधिनियम २०१६ चे तरतूदी अन्वये महाराष्ट्र येथील प्राधिककरणाकडे **क्रमांक** **यासह** प्रकल्पाची नोंदणी केलेली असून सदरची नोंदणी प्रत **जोडपत्र क्रमांक एफ** म्हणून चिन्हीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभात सदर **फ्लॅट / वेश्म** मिळकत विक्री करण्याचे मान्य करून सदरचा करार लिहून नोंदणी अधिनियम १९०८ अन्वये नोंदवून देत आहेत.

प्रस्तुतचे करारात नमूद केलेल्या अटी व शर्तीस आधिन राहून लिहून देणार व लिहून घेणार यांनी परस्पर मान्य केल्यानुसार व उभयतांचे दरम्यानचे करारानुसार लिहून देणार यांनी सदर **फ्लॅट / वेश्म** मिळकत लिहून घेणार यांना विक्री करण्याचे मान्य करीत असून लिहून घेणार हे सदरची मिळकत खरेदी करण्याचे मान्य कबूल करीत आहेत.

**त्याअर्थी आता सदर करारनामा पुढील गोष्टीस व बाबीस साक्षी असून या द्वारे लिहून देणार व लिहून घेणार पुढील प्रमाणे मान्य करतात की,**

१) लिहून देणार हे सदरहू प्रकल्पासंदर्भाने स्थानिक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या इमारत नकाशा व इतर नकाशे तसेच मंजूरीच्या अटी व शर्तीनुसार सदर जमीन मिळकतीवर ०१ इमारत असून **ती इमारत रहिवाशी वापराची आहे व** त्यामध्ये **तळ मजला पार्कींग + चार मजले** असे मंजूर इमारत नकाशाशी सुसंगत असलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करणार आहेत.

परंतु असे की, सदर मंजूर इमारत नकाशा मध्ये उपलब्ध एफ एस आय नुसार अगर वाढीव एफएसआय नुसार फेरबदल करण्यास, इमारत नकाशा रिव्हाईज करण्यास व रिव्हाईज मंजूर नकाशा नुसार वाढीव बांधकाम करण्यास लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कायमची संमती दिलेली आहे तसेच लिहून देणार यांनी बांधकाम करतेवेळी कोणत्याही शासकीय प्राधिकरणाने किंवा कायद्यातील बदलामुळे सदरहू मंजूर इमारत नकाशा मध्ये फेरबदल करावयाचा असल्यास त्याकामी देखील लिहून घेणार यांनी सदरचे दस्ताने कायमची संमती दिलेली आहे, अशावेळी लिहून देणार यांची संमती घेणे आवश्यक राहणार नाही. मात्र शासकीय प्राधिकरणाने किंवा कायद्यातील बदलाचे व्यतिरिक्त लिहून देणार यांनी मंजूर इमारत नकाशा मध्ये फेरबदल करण्याचे ठरविल्यास अशा वेळी जर लिहून घेणार यांना विक्री करण्याचे कायम केलेल्या **फ्लॅट / वेश्म** मिळकतीचे क्षेत्र, तपशिल, स्थिती या मध्ये बदल होत असल्यास त्यावेळी लिहून घेणार यांची लेखी, संमती घेणे लिहून देणार यांचे वर बंधनकारक आहे व राहिल.

१-अ) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचेकडून खरेदी घेण्याचे कायम केलेली व लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना विक्री करण्याचे कायम केलेल्या म्हणजेच प्रस्तुतचे दस्ताचे अखेरीस **नमूद परिशिष्ट – २** मध्ये नमूद केलेल्या मिळकतीची चटई क्षेत्रानुसार किंमत कायम करण्यात आलेली असून त्यानुसार सदनिकेची किंमत ही त्यामध्ये पूरविण्यात येणाऱ्या संपूर्ण **सोई व सुविधा त्याचे वर्णन दस्ताचे अखेरीस नमूद परिशिष्ट – ३** या मध्ये करण्यात आलेले आहे. त्यासह **रक्कम रूपये फक्त )** एवढी कायम करण्यात आलेली आहे.

वर नमूद केल्या नुसार उक्त **फ्लॅट** मिळकतीची व इमारती मधील सामाईक क्षेत्र व सोई तसेच सुविधा यांच्या सह **एकूण किंमत रक्कम रूपये फक्त ) एवढी** कायम करण्यात आलेली असून सदरहू किंमतीस लिहून घेणार यांनी उक्त **फ्लॅट / वेश्म** लिहून देणार यांचे कडून खरेदी घेण्याचे मान्य व कबूल केलेले असून लिहून देणार यांनी उक्त **फ्लॅट / वेश्म**लिहून घेणार यांना खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

१-ब) सदरहू वर नमूद ठरविण्यात आलेल्या किंमतीपैकी **रक्कम रूपये फक्त )** एवढ्या रक्कमेचा भरणा लिहून घेणार यांचे कडून लिहून देणार यांना आगाऊ रक्कम , विसार रक्कम , आंशिक प्रदान म्हणून मिळालेली असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| रक्कम रूपये | तपशिल |
|---|---|

----------------

==============

उर्वरीत **रक्कम रूपये ) एवढी रक्कम** लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना टप्प्याटप्प्याने अदा करण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर संपूर्ण किंमत अदा करण्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

| रक्कम रूपये | तपशिल |
| --- | --- |
| २०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदरचा करारनामा नोंदविल्याचे दिनांकापासून १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे प्लिंथचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे पहिल्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे दुसऱ्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे तिसरा स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे चौथा स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदर इमारतीचे विट बांधकाम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उक्त **फ्लॅट / वेश्म** ज्या मजल्यावरील अंतर्गत गिलावा ( प्लास्टर ), स्वच्छता विषयक जुळण्या , जिने यांचे काम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना इमारतीचे नळकाम, बाहेरील गिलावा ( प्लास्टर ) गच्चीचे काम पूर्ण झाले नंतर १० दिवसाचे आत अदा करावयाचे आहेत. |
| ५% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उदवाहन, पाण्याचे पंप, विद्यूत जोडणी, अंगभूत क्षेत्राची फरसबंदी व इतर कामे पूर्ण झालेनंतर १० दिवसांचे आत अदा करावयाचे आहेत. |
| १०% | एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उक्त इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होवून कब्जा लिहून घेणार यांनी स्विकारण्या संदर्भाने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लेखी कळविल्याचे दिनांकापासून १० दिवसाचे आत करावयाचे आहेत. |
| --------------- | |
| १००% | एकूण |
| ============== | |

१ - क ) सदर उक्त नमूद किंमत ही सदनिकेचा ताबा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना देतेवेळे पावेतो प्रकल्पाच्या बांधकामा संदर्भाने व चालू कामासंदर्भाने लागू असलेले सर्व कर जसे की, जी. एस. टी., व इतर कर , उपकर वगळून आहेत म्हणजेच सदर कर किंमतीचे रक्कमे मध्ये समाविष्ट

नाही. तसेच या करा व्यतिरिक्त भविष्यात बांधकाम चालू असे पावेतो व त्यानंतरही जे कोणतेही कर लागू होतील, ते कर हे देखील वगळून आहे. त्यानुसार सदरहू दस्तान्वये, व्यवहारान्वये तसेच सदरहू अपार्टमेंट / सोसायटी संदर्भाने लागू **असलेले कर, उपकर, जी. एस. टी. व इतर कर लिहून घेणार** यांनी लिहून देणार यांनी मागणी केले नंतर १० दिवसाचे आत लिहून देणार यांना अदा करावयाचे आहे. तसेच राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने अगर स्वायत्त संस्थेने कोणताही नव्याने कर लागू केल्यास व भरावा लागल्यास सदरचा कर तुम्ही तुमचे हिश्शेराशीनुसार लिहून देणार यांनी मागणी केले नंतर १० दिवसांचे आत लिहून देणार यांना अदा करावयाचे आहे. मात्र यदाकदाचित असा कर भरण्याची जबाबदारी आल्यास व ती रक्कम तुमचे वतीने आम्ही भरल्यास सदरहू रक्कम, तुमचे कडून नुकसान व्याजासह व खर्चासह वसुल करण्याचा संपूर्ण हक्क आम्ही लिहून देणार यांना प्राप्त आहे.

तसेच सदरहू **उक्त सामाईक पाणी कनेक्शन व स्वतंत्र विद्युत कनेक्शन पुरविणेकामी** लागणारी रक्कम ठरलेल्या किंमती व्यतिरिक्त लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना वेगळी द्यावयाची आहे. सदरची रक्कम देखील लिहून देणार यांनी मागणी केल नंतर लिहून घेणार यांनी १० दिवसाचे आत लिहून देणार यांना अदा करावयाचे आहे. त्यानुसार इमारतीस सामाईक नळ कनेक्शन नाशिक महानगर पालीका नाशिक यांचे कडून लिहून देणार हे मिळवून देतील तसेच स्वतंत्र विद्युत कनेक्शन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे कडून लिहून देणार हे मिळवून देतील तसेच संपूर्ण प्रकल्पा मधील सांडपाणी व्यवस्थेकामी नाशिक महानगर पालीका नाशिक यांचे ड्रेनेज लाईनमध्ये जोडणी करून देण्यात येईल.

या व्यतिरिक्त भविष्यात मिळकती संदर्भाने भरावे लागणारे कर देखील लिहून घेणार यांनी अदा करावयाचे आहेत.

१-ड) सदर उक्त सदनिकेची लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान ठरलेली किंमत ही वृध्दी मुक्त अशी आहे म्हणजेच सदर किंमतीमध्ये कोणत्याही स्वरूपाची वाढ करण्यात येणार नाही मात्र वर नमूद कर तसेच सक्षम प्राधिकरणाने विकास शुल्क व इतर करामध्ये वाढ केल्यास त्यानुसार व त्याप्रमाणात होणारी वाढीव रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना किंमतीव्यतिरिक्त त्यांचे हिश्शेराशीनुसार द्यावयाची आहे, मात्र अशा वेळी मागणीपत्रासोबत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना उक्त अधिसुचना/आदेश/नियम याची प्रत द्यावयाची आहे. त्यानुसार सदर वाढीव रक्कम लिहून देणार यांनी मागणी केले नंतर १० दिवसाचे आत लिहून देणार यांना अदा करावयाचे आहे.

१-इ) लिहून देणार यांनी उक्त **फ्लॅट / वेश्म** ज्या इमारतीमध्ये आहे त्याचे बांधकाम पूर्ण झालेनंतर एकूण अंतिम चटई क्षेत्र निश्चीत करतील व त्याप्रमाणे प्रस्तावित चटई क्षेत्रामध्ये काही बदल असल्यास त्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळवतील व त्यानुसार उक्त सदनिकेचे अंतिम चटई क्षेत्र निश्चीत करण्यात येईल व त्यानुसार एकूण किंमत निश्चीत करण्यात येईल , मात्र अशी पूर्तता झाले नंतर सदर करारामध्ये नमूद उक्त सदनिकेचे चटई क्षेत्रामध्ये ३% पर्यंत कोणतीही वाढ अगर घट ( बदल ) झाल्यास सदनिकेचे किंमती मध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही, परंतु उक्त सदनिकेचे चटई क्षेत्र ३% पेक्षा

जास्त घट झाल्यास घट झालेल्या क्षेत्राची किंमत जादा रक्कम धरण्यात येईल व सदरची जादा रक्कम ज्या दिनांकास लिहून देणार यांना प्राप्त झाली त्या दिनांकापासून नियमात विनिर्दिष्ट केलेल्या वार्षिक व्याजदराने ४५ दिवसाचे

आत लिहून देणार हे लिहून घेणार यांना परत करतील. तसेच उक्त **फ्लॅट / वेश्म** मिळकतीचे चटई क्षेत्रामध्ये ३% पेक्षा जास्त झाल्यास वाढीव क्षेत्राची किंमत लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना, लिहून देणार यांनी मागणी केल्याचे दिनांकापासून ४५ दिवसाचे आत विनाशर्त अदा करावयाची आहे. सदरहू वाढ अगर घट झाल्यास किंमतीचा दर हा प्रस्तुतचे दस्तातील कलम १-अ यात नमूद चटई क्षेत्राचे किंमतीनुसार प्रती चौ. मी. दराने करण्यात येईल.

१-एफ ) प्रस्तुतचे कराराअंतर्गत नमूद लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कोणत्याही रक्कमा देय असतील त्या रक्कमा करीता लिहून घेणार यांनी पूर्वी दिलेल्या रक्कमा वर्ग करण्याचा व त्यांचे समायोजन करण्याचा हक्क व अधिकार लिहून देणार यांना राहिल. त्यावर लिहून घेणार यांना हरकत घेण्याचा अधिकार राहणार नाही. त्यानुसार देय रक्कमालिहून घेणार यांनी वेळोवेळी लिहून देणार यांना अदा करावयाच्या आहेत.

२.१) लिहून देणार हे याद्वारे कबूल करतात की, सदरहू उक्त इमारतीचे नकाशे मंजूर करते वेळी किंवा त्यानंतर व बांधकाम पूर्ण होतेवेळे पावेतो संबंधीत स्थानिक प्राधिकरणा कडून लादण्यात येतील अशा कोणत्याही असल्यास, सर्व अटी, शर्ती, विनिर्देश आणि निर्बंध यांचे अनुपालन करण्याचे ते पार पाडण्याचे त्यांचे पालन करण्याचे आणि लिहून घेणार यांना व्यक्तीला सदनिकेचा/ वेश्माचा ताबा सोपविण्यापूर्वी, वेश्माच्या / सदनिकेच्या संबंधी स्थानिक प्राधिकरणा कडून भोगवटा प्रमाणपत्र मिळवून देण्याचे मान्य करीत आहेत. मात्र या नुसार स्थानिक प्राधिकरणा कडून भोगवटा प्रमाणपत्र झालेनंतर कोणत्याही नव्याने अटी, शर्ती , विनिर्देश आणि निर्बंध आल्यास त्याची कोणतीही जबाबदारी लिहून देणार यांची राहणार नाही.

२.२) मुदत हे प्रवर्तक/ लिहून देणार तसेच वाटपग्रही / लिहून घेणार व्यक्तीचे मुलतत्व आहे. लिहून देणार / प्रवर्तक हे सदरहू उक्त इमारतीचे बांधकाम / प्रकल्प पूर्ण करण्याकरीता आणि लिहून घेणार व्यक्तीस वेश्म/**फ्लॅट / वेश्म** याचा ताबा देण्या करीता आणि भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याकरीता तसेच वाटपग्रही व्यक्तीच्या संघाला सामाईक क्षेत्र सोपविण्यासाठी, आखून दिलेल्या/ करारामध्ये नमूद वेळापत्रकास बांधील असलेले त्याच प्रमाणे लिहून घेणार व्यक्ती, सदर करारामध्ये नमूद सर्व देयय रक्कमा, हप्ते, आणि यापूर्वी उल्लेखीत कलम १-ब मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचवेही लिहून देणार यांचे कडून बांधकाम पूर्ततेच्या आधिन राहून, करारान्वये लिहून घेणार यांना देय असलेल्या इतर रक्कमांचे वेळचेवेळी प्रदान करीत आणि आंबधने भागवील व देणी पूर्ण करतील.

३) प्रवर्तक / लिहून देणार याद्वारे घोषीत करीत आहे की, उक्त इमारतीच्या/ प्रकल्पाच्या जमीनीच्या संबंधात आज पर्यंतचे उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांक हे केवळ **३४३.३६ चौ. मी.** आहे आणि प्रवर्तक / लिहून देणार यांनी उक्त प्रकल्पाला लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमा वलीच्या नुसार अधिमुल्याचे प्रदान करून अतिरिक्त **३०.०० चौ. मी. विकास हक्काच्या** हस्तांतरणाचा किंवा चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ घेतलेला आहे. तसेच प्रवर्तक/लिहून देणार यांनी उक्त प्रकल्पाला लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीच्या नुसार **हस्तांतरणीय विकास हक्क ( टि. डि. आर. ) टि. डि. आर. क्षेत्र ७०.०० चौ. मी. एवढे क्षेत्र सर्टिफिकेट क्रमांक ७५१ मधील** यास लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलींच्या नुसार अतिरिक्त **७०.०० चौ. मी. चटई क्षेत्राचा** लाभ घेतलेलला आहे. आणि लिहून घेणार / वाटपग्रही व्यक्ती, सदर चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर करून आणि घोषित प्रस्तावित चटई क्षेत्र निर्देशांक हा केवळ प्रवर्तकाचा आहे असे

समजून प्रवर्तकाकडून करावयाच्या वेश्माची विक्री करण्याचे मान्य करीत आहे.

तसेच याउपरही भविष्यात कोणत्याही कारणास्तव सदरहू प्रकल्पाचे/इमारतीचे संबंधाने लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीच्या बदलाने वर नमूद उपलब्ध चटई क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास सदर वाढीव चटई क्षेत्रावर लिहून देणार /प्रवर्तक यांचा मालकी हक्क राहिल व त्यानुसार सदर वाढीव चटई क्षेत्रानुसार बांधकाम करण्याचा हक्क लिहून देणार / प्रवर्तक यांना ाहिल त्यावर ल्लिहून घेणार/ वाटपग्रही यांनी कोणतीही हरकत घ्यावयाची नाही, मात्र इमारतीचे बांधकाम पूर्ण होवून तसेच भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होवून प्रकल्प वाटपग्रही व्यक्तीच्या संघाला हस्तांतरीत झाले नंतर अशा कोणत्याही चटई क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास सदरचे वाढीव चटई क्षेत्र हे वाटपग्रही व्यक्तीच्या संघाला सामाईक हक्काचे व अधिकाराचे म्हणून वर्ग करण्यात येईल.

४.१) जर प्रवर्तकाने / लिहून देणार यांनी प्रकल्प/ उक्त इमारतीचे बांधकाम पूर्ण करून वाटपग्रहीस मुदतीत कब्जा देण्यास कसूर केल्यास अशा प्रसंगी , लिहून देणार / प्रवर्तक प्रकल्प रद्द करू इच्छीत नसल्यास, त्यावेळे पावेतो , लिहून घेणार / वाटपग्राहीकडून लिहून देणार / प्रवर्तक यांना किंमती पोटी जेवढी रक्कम प्राप्त झालेली आहे, त्या रक्कमेवर विलंबाच्या प्रत्येक महिन्यासाठी**१८% द. सा. द. शे. व्याज** किंवा नियमात विनिर्दिष्ट या पेक्षा जे जास्त असेल ते व्याज हे , ताबा/ कब्जा देण्यात येई पर्यंत लिहून देणार / प्रवर्तक देण्याचे मान्य करीत आहेत, या उलट या कराराच्या अटींनुसार लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना देय असलेल्या सर्व प्रलंबीत रक्कमांवर रक्कम देय असेल त्या दिनांकापासून **१८% द. सा. द. शे. व्याज किंवा नियमात विनिर्दिष्ट** या पेक्षा जे जास्त असेल ते केल्याप्रमाणे लिहून घेणार हे लिहून देणार यांना व्याज देण्याचे मान्य करीत आहेत.

४.२) वरील उपखंड ( ४.१) च्या बाबतीत आकरावयाच्या व्याजाच्या लिहून देणार / प्रवर्तकाच्या हक्कास बाधा न आणता, या करारान्वये ( संबंधीत प्राधिकरणाकडून आकारण्यात येणाऱ्या करांचा लिहून घेणार यांचा प्रमाणशिर हिस्सा आणि इतर कर, जावक रक्कमा यासह ) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना देय व प्रदेय असलेली कोणतीही रक्कम/ रक्कमा ह्या देय दिनांकास प्रदान करण्यास कसूर करण्याऱ्या वाटपग्रही व्यक्तीस संबंधीचा आणि तीन हप्त्याचे प्रदान करण्यास कसूर करणाऱ्या वाटपग्रही व्यक्ती संबंधीचा स्वत:च्या मताने करार कायमस्वरूपी रद्द करण्याचा एकतर्फी हक्क लिहून देणार/ प्रवर्तक यांना राहिल.

परंतु प्रवर्तक/ लिहून देणार हा करार समाप्त करण्याचा त्याचा उद्दशे असल्याची व करार समाप्त करण्याच्या उद्देशाच्या संबंधातील भंग झालेल्या अटी व शर्ती नमूद करून तशी **१५ दिवस** मुदतीची नोटीस लिहून घेणार यांना लिहून घेणार यांनी दिलेल्या पत्त्यावर नोंदणीकृत पोहोच देय डाकेने देण्यात येईल. सदर नोटीस कालावधी मध्ये लिहून देणार यांनी / प्रवर्तकाने नमूद केलेला किंवा केलेल्या शर्त भंग दूर करण्यास लिहून घेणार यांनी कसूर केल्यास सदरची **१५ दिवसाची** मुदत संपले नंतर लिहून देणार / प्रवर्तक सदरचा करार समाप्त करण्यास हक्कदार असेल आणि त्यानुसार सदरचा करार समाप्त झाल्यावर लिहून देणार / प्रवर्तक त्यास योग्य वाटेल अशा संपूर्ण स्वेच्छानिर्णयाने उक्त **फ्लॅट / वेश्म** मिळकत त्रयस्थ इसमांस विक्री करण्यास हक्कदार असेल व तसे लिहून देणार /प्रवर्तक यांना स्वातंत्र असेल.

परंतु आणखी असे की, वर नमूद केल्या नुसार सदर करार समाप्त झाल्यावर प्रवर्तक/ लिहून देणार हे लिहून घेणार यांना त्या तारखेपावेतो लिहून देणार यांना लिहून घेणार यांनी अदा केलेल्या किंमतीचे हप्त्याचे एकूण रक्कमेपैकी **५% रक्कम** परिसापन हानीच्या स्वरूपात कपात करून

तसेच इतर कोणत्याही देय असणाऱ्या कोणत्याही रक्कमेच्या समायोजनेस व वसुलीस आधीन राहून उर्वरीत रक्कम करार समाप्तीच्या दिनांकापासून **३० दिवसाचे** बिनव्याजी परत करतील. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज देण्यास लिहून देणार / प्रवर्तक जबाबदार असणार नाही. तसेच लिहून घेणार यांनी करापोटी कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती शासनास / स्वायत्त संस्थेस अदा झालेली असल्यास ती अगर तशा रक्कमा लिहून घेणार यांना परत करण्याची कोणतीही जबाबदारी लिहून देणार यांची राहणार नाही.

५) प्रवर्तकाने / लिहून देणार यांनी उक्त इमारतीत व सदनिकेमध्ये पूरवायच्या सुविधा, खिळण्या व जोडण्या ( fixtures and fittings ) आणि स्वच्छता विषयक जोडण्या व उद्वाहन या सारख्या सोयी सुविधा यांचे तपशिलासह सविस्तर माहिती या करारासोबत **जोडलेल्या परिशिष्ट – ३** मध्ये नमूद करून दिलेली आहे.

६) प्रवर्तक / लिहून देणार हे लिहून घेणार / वाटपग्राही व्यक्तीला वाटपग्राही व्यक्तीने प्रस्तुतचे करारामध्ये नमूद सर्व देयकांचे प्रदान देय दिनांकास केल्यास **दिनांक रोजी** किंवा त्यापूर्वी **फ्लॅट / वेश्म**ाचा ताबा देतील, जर प्रवर्तकाने / लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे कडून सर्व देयकांचे वेळेवर प्रदान होवून देखील वर नमूद दिनांकास प्रवर्तकाचे / लिहून देणार यांचे आवाक्याबाहेरील कारणांमुळे लिहून घेणार यांना कब्जा देण्यास कसूर केल्यास / कसूर करीत असल्यास किंवा हयगय करीत असल्यास तर, प्रवर्तकाने रक्कम मिळाल्याचे दिनांकापासून व त्यावरील व्याजाची परतफेड करण्याचे दिनांकापर्यंत वरील **खंड ४.१** मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्याच व्याजदराने प्रवर्तक/ लिहून देणार सदनिकेच्या सबंधात वाटपग्राही/ लिहून घेणार यांचे कडूनमिळालेल्या किंमतीच्या रक्कमेचा परतावा करण्यास जबाबदार असेल. अशा प्रकारे लिहून घेणार यांनी वर नमूद केल्यानुसार **फ्लॅट / वेश्म** मिळकती संदर्भाने अदा केलेली संपूर्ण किंमतीची रक्कम व्याजासह मागणी केल्यास व त्यानुसार लिहून देणार/ प्रवर्तक यांनी किंमतीची रक्कम + व्याज यांचा परतावा केल्यास सदर **फ्लॅट / वेश्म** मिळकतीवर लिहून घेणार यांचा कोणताही हक्क राहणार नाही व प्रस्तुतचा करार समाप्त होईल.

परंतु प्रवर्तक/ लिहून देणार ज्या इमारतीमध्ये **फ्लॅट / वेश्म** असेल ती इमारत पूर्ण होण्यास जर

(अ) युद्ध , नागरी विक्षोभ किंवा दैवी कृती

(ब) शासनाची, न्यायालयाची आणि किंवा इतर सार्वजनिक अथवा समि प्राधिकरणाची कोणतीही नोटीस , आदेश, नियम, अधिसूचना या कारणांमुळे विलंब होत असेल तर,

(क) शासन/ प्राधिकारणाकडून कोणतीही परवानगी मिळण्यास विलंब होत असेल तरी.

(ड) लिहून घेणार यांचे कसुराने उपरोक्त तारखेस **फ्लॅट / वेश्माचा** ताबा देण्यासाठी विनाव्याज मुदतवाढ मिळण्यास हक्कदार असेल.

**७,१) ताबा घेण्यासाठी कार्यपद्धती :**

प्रवर्तक/ लिहून देणार हे , सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळविल्यावर आणि करारानुसार वाटपग्राही / लिहून घेणार यांनी केलेल्या संपूर्ण प्रदानानुसार **०७ दिवसाचे** आत वाटपग्राहीस ताबा स्विकारणे संदर्भाने लेखी कळवतील व ताबा लेखी स्वरूपात देवू करतील, तसेच अशा नोटीशीचे **३ महिन्याचे** आत प्रवर्तक/ लिहून देणार हे लिहून घेणार / वाटपग्राही यांचे लाभात तसेच वाटपग्राही संघांची स्थापना करून करून संघाचे लाभात आवश्यक हस्तांतरण दस्त करून देतील. त्यात कसूर झाल्यास वाटपग्राहीची क्षतिपूर्ती करण्याचे प्रवर्तक मान्य करीत आहेत व हमी देत आहेत. लिहून घेणार / वाटपग्राही हे प्रवर्तकाने किंवा यथास्थिती , वाटपग्राहीच्या संघाने निर्धारीत केलेले देखभाल खर्च प्रदान करण्याचे मान्य व कबूल करीत आहेत.

सदर ताबा स्विकारणेपूर्वी प्रस्तुतचे करारानुसार लिहून घेणार / वाटपग्राही यांनी संपूर्ण देय रक्कमा , किंमतीच्या रक्कमा/करांच्या रक्कमा/ विलंबाचे कालावधीचे व्याज असल्यास त्या रक्कमा अगर इतर रक्कमा प्रवर्तक / लिहून देणार यांना देणे बंधनक कारक राहणार आहे. सदर रक्कमा पूर्णपणे अदा केल्या शिवाय

लिहून घेणार / वाटपग्राही यांना उक्त सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येणार नाही. त्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावयाचा आहे.

**वाटपग्राही / लिहून घेणार**

________________________

______________________________

______________________________

______________________________

**लिहून देणार/ प्रवर्तक**

**बद्रीनाथ हाईटस् को-ऑप. हाऊसिंग सोसायटी**
**लि., नाशिक तिचा नोंदणी क्रमांक एन. एस. के./**
**एन. एस. के. /एच. एस. जी. / टी. सी.**
**५६८६/२०१७ दिनांक १७/०४/२०१७**
**तर्फे चेअरमन श्री. राजेकुमार मोती गुप्ता**
राहणार : रेणूका अपार्टमेंट पाथर्डीरोड, पांडवनगरी, नाशिक

७.२) वाटपग्राही / लिहून घेणार यांनी वर नमूद केल्यानुसार रक्कमांचे प्रदान केल्यानंतर प्रवर्तकाने / लिहून देणार यांनी उक्त फ्लॅट किंवा दुकान वापरासाठी व भोगवटा करण्यासाठी तयार आहे असे कळविणारी लेखी नोटीस वाटपग्राहीला दिल्यापासून **१५ दिवसाचं आत** लिहून घेणार / वाटपग्राही हे उक्त **फ्लॅट किंवा दुकान** मिळकतीचा ताबा घेतील.

**७.३) फ्लॅट / वेश्माचा ताबा घेण्यात वाटपग्राहीने / लिहून घेणार यांनी कसूर केल्यास :**

वर नमूद कलम / खंड ७.१ नुसार प्रवर्तकाकडून / लिहून देणार यांचे कडून लेखी सुचना प्राप्त झाल्यावर लिहून घेणार / वाटपग्राही प्रवर्तकाकडून / लिहून देणार यांचे कडून आवश्यक दस्ताऐवजे करून दिल्यावर ताबा घेतील आणि प्रवर्तक / लिहून देणार हे लिहून घेणार / वाटपग्राही यांना उक्त सदनिकेचा ताबा देतील. जर लिहून घेणार/ वाटपग्राही यांनी मुदतीत ताबा घेण्यास कसूर केल्यास लागू असेल त्या प्रमाणे लिहून घेणार / वाटपग्राही देखभाल खर्च प्रदान करण्यास नियमीतपणे पात असतील.

७.४) जर वाटपग्राहीला वेश्माचा ताबा दिल्याचे दिनांकापासून **पाच वर्षाचे कालावधीत** , सदनिकेमध्ये/ वेश्मामध्ये किंवा ज्या इमारतीमध्ये **फ्लॅट / वेश्म** आहे त्या इमारती मध्ये किंवा त्यामध्ये वापरलेले साहित्य, कारागिरी, दर्जा वि सेवेची तरतूद ह्या कराराप्रमाणे नमूद असलेल्या तपशिलाप्रमाणे नसल्यास अगर कोणतेही बांधकाम दोष असल्यास सदरच्या बाबी, दोष वाटपग्राहीने प्रवर्तकाच्या निदर्शनास आणून दिलेनंतर, जेथे शक्य असेल तेथे, प्रवर्तकाकडून स्वत:च्या खर्चाने असे दोष दूर करतील आणि असे दोष दूर करणे शक्य नसल्यास त्याबाबती वाटपग्राही अधिनियमान्वये तरतूद केलेल्या रितीने अशा दोषाबद्दल प्रवर्तकाकडून नुकसान भरपाई मिळविण्यास पात्र असेल. जर इमारती मध्ये कोणत्याही दोषांच्या किंवा साहित्याच्या संबंधात एखादा विवाद असेल तर हे प्रकरण ताबा सुपुर्द केल्याच्या दिनांकापासून पाच

वर्षाच्या कालावधीत वाटपग्राही यांनी नियामक प्राधिकरणाकडून निर्धारीत करण्यात येईल अशी फी प्रदान केल्यावर स्थावर संपदा ( विनियमन व विकास ) अधिनियम २०१६ चे कलम -७२ अन्वये अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल.

तसेच वाटपग्राहीच्या सदर बाबींच्या दैनंदिन वापरामुळे, चुकीच्या वापरामुळे, अगर प्रवर्तकाने सदर सुविधा, बाबी पूरविल्यानंतर त्याचे स्वरूप अगर त्यामध्ये वाटपग्राही यांनी बदल केलेले असल्यास अगर इतर तत्सम कारणामुळे कोणतीही तोडफोड, दोष निर्माण झालेले असल्यास त्याची कोणतीही जबाबदारी प्रवर्तकाची राहणार नाही.

८) वाटपग्राही हे सदर उक्त **फ्लॅट / वेश्म** मिळकत ही निवास/ रहिवास याच प्रयोजनासाठी वापर करतील तसेच वाटपग्राही यांना वाहनतळ देण्यात येत असेल तर त्या मालकी देण्यात आलेल्या वाहनतळाचा वापर केवळ वाहनतळ या प्रयोजनसाठी करतील.

९) वाटपग्राही , इमारतीमधील वेश्मीकांच्या इतर वाटपग्राही सह प्रवर्तक स्वमताने व स्वेच्छानिर्णयाने ठरवली अशा नावाने ओळखली जाणारी संस्था, संघ किंवा मर्यादित कंपनी स्थापन करण्यामध्ये सहभागी होइल आणि प्रयोजनार्थ , प्रस्तावित संस्थेच्या संघाच्या उपविधी सह नोंदणी आणि किंवा सदस्यत्वासाठीचा अर्ज आणि संस्था किंवा मर्यादित कंपनी स्थापन करण्यासाठी व तिची नोंदणी करण्यासाठी आणि सदस्य बनण्यासाठी आवश्यक असलेली इतर कागदपत्रे व दस्तऐवजे या वेळोवेळी सही करील व ते करून देईल आणि प्रवर्तकाला वाटपग्राहीच्या सामाईक संघाची नोंदणी करणे शक्य व्हावे म्हणून, प्रवर्तकाने वाटपग्राहीस दस्तऐवज पाठविल्या पासून **०७ दिवसांचे** आत ते यथोचितीरित्या भरली, त्यावर सही करील आणि ते प्रवर्तकाकडे परत पाठवील. यथास्थिती सहकारी संस्था किंवा कंपनीचा निबंधक किंवा अन्य कोणताही सक्षम प्राधिकारी याद्वारे आवश्यक असेल त्याप्रमाणे, उपविधीचा मसुदा किंवा ज्ञापन आणि किंवा संस्थापन नियमावली यामध्ये जर कोणतेही बदल किंवा फेरबदल केले असतील तर वाटपग्राही हरकत घेणार नाही.

१०) लिहून घेणार / वाटपग्राही हे सदर करारनाम्यानुसार लिहून देणार / प्रवर्तक हे मागणी करतील त्यानुसार **१५ दिवसाचें आत** खालील रक्कमा लिहून देणार यांना देतील.

(अ) संस्था/ संघ किंवा मर्यादित कंपनी यांची स्थापना आणि नोंदणीसाठी होणारी खर्चाची रक्कम.

(ब) पाणी, विद्युत आणि इतर उपयुक्त सुविधा व सेवा जोडणीपोटी जमा करावयाची रक्कम.

(क) संस्था / संघ किंवा मर्यदित कंपनीच्या खर्चाकरीता तात्पुरत्या मासिक अंशादानापोटी जमा करावयाची रक्कम.

(ड) या व्यतिरिक्त अधिनियमानुसार प्रवर्तकाचे दायीत्व नसलेली मात्र **फ्लॅट / वेश्म** प्रकल्पा संदर्भाने अदा करावी लागेल ती रक्कम.

(इ) संस्था / संघ किंवा मर्यादित कंपनी यांची स्थापना आणि नोंदणीसाठी न्यायवादी / अधिवक्ता यांच्या व्यावसायीक खर्चाची रक्कम.

(उ) संस्था / संघ किंवा मर्यादित कंपनी यांच स्थापना आणि नोंदणीसाठी मुद्रांक शुल्काचा व नोंदणी फी पोटी रक्कम.

११) **प्रवर्तकाचे प्रतिनिधीत्व आणि आश्वासने :**

प्रवर्तक, याद्वारे पुढीलप्रमाणे वाटपग्राहीचे प्रतिनिधित्व करीत आहे आणि आश्वासन देत आहे.

(एक) प्रवर्तकाकडे या करारनाम्यास जोडलेल्या मालकी हक्क अहवालामध्ये घोषित केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या जमीनीच्या बाबतीत स्पष्ट व विक्री योग्य मालकी हक्क आहे आणि प्रकल्पाच्या जमीनीवर

विकासकामे करण्याचे आवश्यक हक्क आहेत आणि प्रकल्पाच्या अंमल बजावणी करीता प्रकल्पाच्या जमीनीच्या वास्तविक, प्रत्यक्ष व कायदेशीर कब्जा देखील आहे.

(दोन ) प्रवर्तकाकडे प्रकल्पाचा विकास करण्याचा कायदेशीर हक्क आहे व त्यास सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक त्या मान्यता घेतलेल्या आहेत आणिक प्रकल्पाचा विकास करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडून वेळोवेळी आवश्यक त्या मान्यता घेईल.

(तीन) मालकी हक्क अहवालामध्ये प्रकट केलेल्या भाराव्यतिरिक्त प्रकल्पाच्या जमीनीवर अथवा प्रकल्पावर कोणताही भार नाही.

(चार) मालकी हक्क अहवालात प्रकट केलेल्या व्यतिरिक्त प्रकल्पाच्या जमीनीच्या किंवा प्रकल्पाच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात कोणताही वाद प्रलंबीत नाही.

(पाच) प्रकल्पाच्या प्रकल्प जमीनीच्या आणि उक्त इमारतीच्या / भागाच्या ( विंग ) बाबती सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या सर्व मान्यता, लायसन्स व परवाने वैध आणि विद्यमान आहेत, कायद्याची रितसर प्रक्रिया अनुसरून ते मिळविण्यात आले आहेत. याशिवाय प्रकल्पाच्या जमीनीच्या आणि उक्त जमीनीच्या व उक्त इमारतीच्या / भागाच्या बाबती सक्षम प्राधिकरणाने द्यावयाच्या सर्व मान्यता, लायसन्स, व परवाने कायद्याची रितसर प्रक्रिया अनुसरून मिळविले जातील आणि, प्रकल्पाच्या , प्रकल्प जमीनीच्या इमारतीच्या / भागाच्या ( विंग ) व सामाईक क्षेत्राच्या संबंधात सदैव लागू असलेल्या सर्व कायद्याचे पालन केले जाईल.

(सहा ) प्रवर्तकाला, सदर करारनामा करण्याचा हक्क असेल आणि ज्याद्वारे , यामध्ये निर्माण झालेल्या वाटपग्राहीच्या हक्कास, मालकीहक्कास व हितसंबंधात बाधा पोहोचेल अशी कोणतीही कृती किंवा गोष्ट करणार नाही किंवा करण्याचे टाळणार नाही.

(सात ) प्रवर्तक, ज्यामुळे या करारनाम्याखालील वाटपग्राहीच्या हक्कास कोणत्याही रीतीने , बाधा पोहोचेल असा प्रकल्प उक्त (**फ्लॅट / वेश्म** ) यासह, प्रकल्पाच्या जमीनीच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तिशी किंवा पक्षाशी विक्रीचा कोणताही करारनामा आणि किंवा विकास करारनामा किंवा अन्य कोणताही करारनामा व्यवस्था करणार नाही.

(आठ ) प्रवर्तक अशी पृष्टी देत आहे की, या करारनाम्यात योजिलेल्या रितीने, वाटपग्राहीला उक्त ( वेश्माची/ सदनिकेची/ भुखंडाची) विक्री करण्यापासून ज्या कोणत्याही असेल अशा कोणत्याही रितीने निर्बंधीत केलेले नाही.

(नऊ) प्रवर्तक या करारनाम्यात योजिलेल्या रितीने, वाटपग्राहीच्या संघास संरेचनेचे अभिहस्तांतरण पत्र करून देते वेळी, वाटपग्राहीच्या संघाकडे संरचनेच्या सामाईक क्षेत्रांचा कायदेशीर, रिक्त, शांततापूर्ण, प्रत्यक्ष ताबा सुपूर्द करील.

(दहा ) प्रवर्तकाने उक्त प्रकल्पाच्या बाबतीत, सक्षम प्राधिकरणांस प्रदेय असलेले जे कोणतेही असतील अशी अविवादीत शासकीय देणी, दर, आकार व कर आणि इतर रक्कमा, कर आकारणी, कर लादणी, अधिमुल्ये, नुकसान भरपाई आणि किंवा शास्ती व इतर अदत्त रक्कमा यथोचित पणे प्रदान केल्या आहेत आणि नियमितपणे प्रदान करील व चुकत्या करील.

(अकरा) मालकीहक्क अहवालामध्ये उघड केलेले असेल त्याखेरीज, प्रवर्तकास , प्रकल्पाच्या जमीनीच्या आणि किंवा प्रकल्पाच्या संबंधात, शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही स्थानिक संस्थेकडून किंवा प्राधिकनरणाकडून किंवा कोणत्याही कायदे मंडळाच्या अधिनियमिती, शासकीय अध्यादेश, आदेश, अधिसुचना याद्वारे उक्त मालमत्तेच्या

संपादनाच्या किंवा अधिग्रहणाच्या कोणत्याही नोटीसीसह कोणतीही नोटीस मिळालेली नाही किंवा प्रवर्तकावर बजावलेली नाही.

१२) **फ्लॅट / वेश्म** ज्यांच्या ताब्यात आहे अशा सर्व व्यक्तींना एकत्रित आणण्याच्या हेतुने वाटपग्राही/ वाटपग्राही किंवा तो/ ती स्वत: ते / त्या स्वत: याद्वारे प्रवर्तकासोबत पुढील प्रमाणे प्रसंविदा करतात की,

(एक) ज्या तारखेस वेश्माचा/ सदनिकेचा ताबा घेतला आहे त्या तारखेपासून वेश्म वाटपग्राही स्वत:च्या खर्चाने चांगल्या व राहण्यास योग्य अशा स्थितीत ठेवणे आणि ज्या इमारतीत वेश्म आहे त्या इमारतीमध्ये जी नियम, विनियम किंवा उपविधी या विरूद्ध असेल अशी कोणतीही गोष्ट करणार नाही किंवा इमारतीला कोणताही बाधा पोहचविणार नाही अथवा आवश्यक असल्यास स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय , ज्या इमारतीत वेश्म आहे त्या इमारतीमध्ये किंवा खुद्द वेश्मामध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये बदल करणार नाही / फेरफार करणार नाही किंवा भर घालणार नाही.

(दोन) ज्या वस्तु जोखमीच्या, ज्वलनशिल किंवा धोकादायक स्वरूपाच्या आहेत किंवा ज्या इतक्या जड आहेत की, ज्या इमारतीस वेश्म आहे त्या इमारतीच्या बांधकामास किंवा संरचनेस धोका पोहचवतील अशा वस्तुंचा अथवा ज्या साठविण्यास संबंधीत स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाने आक्षेप घेतलेला आहे अशा कोणत्याही वस्तुंचचा वेश्मामध्ये साठा करणार नाही आणि ज्या इमारतीत वेश्म आहे त्या इमारतीच्या प्रवेशद्वारासह ज्या इमारतीत वेश्म आहे त्या इमारतीचा जिना, सामाईक जागा ( पॅसेज ) किंवा इतर कोणतीही संरचना यांना नुकसान पोहोचेल किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव असेल असे जड पुडके (पॅकेजेस) वाहून नेताना काळी घेईल आणि ज्या इमारतीत वेश्म आहे त्या इमारतीला किंवा वेश्माला वाटग्राहीच्या निष्काळजीपणामुळे किंवा कसूरीमुळे कोणतेही नुकसान पोहचेल तर त्याबाबतीत वाटपग्राही उल्लंघनाच्या परिणामास जबाबदार असेल.

(तीन) उक्त सदनिकेची सर्व अंतर्गत दुरूस्ती ही, त्याच्या स्वत:च्या खर्चाने करील, आणि **फ्लॅट / वेश्म** प्रवर्तकाने वाटपग्राहीला ज्या स्थितीत दिलेली होती त्याच स्थितीत ठेवील आणि संबंधीत स्थानिक प्राधिकरण किंवा इतर सार्वजनिक प्राधिकारणाचे नियम व विनियम आणि उपविधी याविरूद्ध **फ्लॅट / वेश्म** ज्या इमारतीत आहे त्या इमारतीमध्ये किंवा सदनिके मध्ये कोणतीही गोष्ट करणार नाही किंवा इमारतीला किंवा सदनिकेला कोणतीही गोष्ट करून बाधा पोहचविणार नाही. वाटपग्राही वरील तरतूदीचे उल्लंघन करणारी कोणतीही कृती करील त्या प्रसंगी , वाटपग्राही हा संबंधीत स्थानिक प्राधिकरणाला आणि किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाला त्याच्या उल्लंघनासाठी जबाबदार व पात्र असेल.

(चार) **फ्लॅट / वेश्म** किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकणार नाही किंवा पाडून टाकण्याची व्यवस्था करणार नाही किंवा सदनिकेमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये कोणत्याही वेळी कोणतीही वाढ किंवा फेरबदल करणार नाही किंवा करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा ज्या इमारतीमध्ये **फ्लॅट / वेश्म** आहे त्या इमारतीच्या दर्शनी व बाहेरी रंग योजनेमध्ये कोणताही फेरबदल करणार नाही आणि सदनिके मधील आणि त्याचा अन्योन्यप्रभावी भाग, मलवाही, गटार, नळ चांगल्या दुरूस्ती योग्य स्थितीत ठेवील आणि विशेषत: निवार व ज्या इमारतीत **फ्लॅट / वेश्म** आहेत, त्या इमारतीच्या इतर भागांचे संरक्षण या साठी आणि प्रवर्तक आणि किंवा संस्था किंवा मर्यादित कंपनी यच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय सदनिकेतील खांब (कॉलम्स) , तळई , भिंती लादी किंवा प्रलंबित कॉंक्रीट सिमेंट ( आरसीसी ) , पर्डीज किंवा इतर

संरचनात्मक भागांना छिन्नी लावणार नाही किंवा इतर कोणत्याही रितीने नुकसान पोहचविणार नाही.

(पाच) प्रकल्पाच्या जमीनीचा व ज्या इमारतीत **फ्लॅट / वेश्म** आहे त्या इमारतीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा कोणताही विमा शुन्यवत किंवा शुन्य करण्याजोगा असेल किंवा ज्याद्वारे विम्याच्या संबंधात कोणताही वाढीव हप्ता देय झालेला असेल अशी कोणतीही कृती किंवा गोष्ट करू नये किंवा करण्यास परवानगी देवू नये.

(सहा) प्रकल्पाच्या जमीनीच्या आणि ज्या इमारतीत **फ्लॅट / वेश्म** आहे त्या इमारतीच्या आवारात किंवा कोणत्याही भागात उक्त सदनिकेतून घाण, कचरा, चिंध्या, केरकचरा किंवा इतर वस्तु टाकू नयेत किंवा त्या टाकण्यास नकार द्यावा किंवा परवानगी द्यावी.

( सात ) ज्या इमारतीत **फ्लॅट / वेश्म** आहे त्या इमारतीशी संबंधीत पाणी, वीज किंवा इतर कोणतीही सेवा देण्यासाठी संबंधीत स्थानिक प्राधिकरणाने किंवा शासनाने मागणी केलेल्या सुरक्षा ठेवीचा त्याचा हिस्सा, प्रवर्तकाने मागणी केल्याच्या **पंधरा दिवसात** प्रवर्तकाला प्रदान करील.

(आठ) वाटपग्राहीने , निवासी प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी सदनिकेच्या वापरात बदल केल्यामुळे, संबंधीत स्थानिक प्राधिकरण आणि किंवा शासन आणि किंवा इतर सार्वजनिक प्राधिकरण यांच्या कडून आकारण्यात आलेले स्थानिक कर, पाणी पट्टी , विमा व असे इतर कर कोणतेही असल्यास, यामधील वाढ सोसणे व प्रदान करणे.

(नऊ) वाटपग्राहीकडून या करारा अंतर्गत देय असलेली सर्व देणी प्रवर्तकाला पूर्णत: चुकीत केली जाई पर्यंत वाटपग्राही ही **फ्लॅट / वेश्म** भाड्याने , पोटभाड्याने देणार नाही. त्याचे हस्तांतरण, अभिहस्तांतरण करणार नाही किंवा या करारातील हितसंबंध किंवा लाभ विषयक गोष्टी देवून टाकणार नाही किंवा सदनिकेचा कब्जा देवून टाकणार नाही.

(दहा) वाटपग्राही व्यक्ती, संस्थेने किंवा मर्यादित कंपनीने किंवा शिखर मंडळ किंवा महासंघाने सुरूवातीला स्विकारलेले असतील असे सर्व नियम व विनियम यांचे उक्त इमारत व त्यामधील **फ्लॅट / वेश्म** यांचे संरक्षण व परिरक्षण करण्यासाठी आणि संबंधीत स्थानिक व प्राधिकरण व शासन आणि इतर सार्वजनिक संस्था यांचे त्यावेळी असलेले बांधकाम विषयक नियम, विनियम व उपविधी यांचे पालन व अनुपालन करण्यासाठी ते नियम व विनियम यामध्ये वेळोवेही घातलेली भर, केलेले फेरबदल किंवा केलेल्या सुधारणा यांचे पालन व अनुपालन करील, वाटपग्राही व्यक्ती, इमारतीतील सदनिकेच्या भोगवट्या संबंधात व तिच्या वापरासंबंधात संस्थेने/ मर्यादित कंपनीने/ शिखर मंडळ/ महासंघाने घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तीचेही पालन व अनुपालन करील आणि या कराराच्या अटी नुसार असलेले कर, खर्च किंवा इतर देणी नियमीतपणे व वेळेवर प्रदान करील व अंशदान देईल.

(अकरा) संस्थेच्या / मर्यादित नांवे असलेल्या इमारतीत जेथे वेश्म स्थित आहे, अशा इमारतीच्या संरचनेच्या अभिहस्तांतरण पत्राचे निष्पादन होईपर्यंत, वाटपग्राही व्यक्ती, हा प्रवर्तक व त्याचे सर्वेक्षक आणि अभिकर्ते यांना, कामगार व इतर व्यक्ती यांच्यासह किंवा त्यांच्याशिवाय सर्व वाजवी वेळेत उक्त इमारतीमध्ये वा तिच्या कोणत्याही भागांमध्ये प्रवेश करण्याबाबत त्याच स्थिती व परिस्थितीत पाहण्यासाठी व तपसण्यासाठी परवानगी देईल.

(बारा) ज्या वेश्मामध्ये इमारत आहे व ती इमारत ज्या प्रकल्पाच्या जागेवर स्थित आहे त्या जागेचे इमारतीमध्ये अभिहस्तांतरण शिखर संस्था किंवा महासंघ यांच्या वतीने निष्पादित केले जाईपर्यंत, वाटपग्राही, प्रवर्तक व त्याचे सर्वेक्षक आणि अभिकर्ते यांना,कामगार व इतर व्यक्ती

यांच्यासह किंवा त्यांचे शिवाय , प्रकल्पाची जमीन व तिचा कोणताही भाग यांची स्थिती व परिस्थिती यांचे अवलोकन व तपासणी करण्यासाठी सर्व वाजवी वेळेत करण्याकरीता परवानगी देईल.

(तेरा) वाटपग्राही, सदरहू प्रकल्पामधील अथवा उक्त इमारती मधील इतर **फ्लॅट / वेश्म** हे प्रवर्तक यांनी त्यांचे मर्जीने त्रयस्थ इसमास विक्री करण्यास कधीही कोणतीही हरकत उपस्थित करणार नाहीत, तसेच प्रवर्तक यांनी उक्त इमारतीचे अभिहस्तांतरण संस्था किंवा संघ यांच्या नांवे निष्पादित केले नंतरही, जर काही **फ्लॅट / वेश्म** विक्री शिल्लक असतील तर त्या विक्रीस शिल्लक **फ्लॅट / वेश्म** विक्रीस व त्याकामी प्रवर्तक यांना त्यांचे वतीने इसमांना उक्त इमारतीमध्ये वा तिच्या कोणताही भागांमध्ये प्रवेश करण्याबाबत अगर कार्यवाही करण्याबाबत हरकत करणार नाही.

१३) प्रवर्तक हा वाटपग्राही व्यक्ती कडून त्याला आगाऊ रक्कम किंवा ठेव म्हणून मिळालेल्या रक्कमा, सहकारी संस्था किंवा कपंनीस चालना देण्यासाठी भाग भांडवल म्हणून मिळालेल्या रक्कमा या संबंधात किंवा देणी, कायदेशीर आकार याकरीता एक स्वतंत्र खाते चालू ठेवील आणि त्या रक्कमा ज्या प्रयोजनांसाठी मिळालेल्या आहेत त्या प्रयोजनासाठीच केवळ त्यांचा वापर करील.

१४) या करारात अतंर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा अन्वयार्थ हा उक्त **फ्लॅट / वेश्म** किंवा उक्त भुखंड आणि इमारत किंवा तिचा कोणताही भाग यांचे कायद्यातील इनामपत्र , पट्टांतरण किंवा अभिहस्तांतरण करणे असा लावण्यात येणार नाही किंवा त्याचा तसा उद्देश असणार नाही, वाटपग्राही व्यक्तीला विक्री करावयाच्या सदनिकेच्या संबंधात याद्वारे केलेल्या कराराखेरीज व त्या व्यतिरिक्त त्याला कोणाताही दावा करता येणार नाही, आणि यात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे इमारतीची उक्त संरचना ही संस्था/ मर्यादित कंपनी किंवा अन्य संस्था यांच्या कडे हस्तांतरी केली जाईपर्यंत व प्रकल्पाची जमीन शिखर संस्था/ महासंघ यांच्याकडे हस्तांतरीत केली जाईपर्यंत सर्व मोकळ्या जागा, वाहनतळाच्या जागा, जिने, सज्जे , मनोरंजनाच्या जागा प्रवर्तकाच्या मालमत्तेत राहतील.

१५) प्रवर्तक गहाण अथवा भार आकारणारनाही, प्रवर्तकाने सदर करार अंमलात आणल्यानंतर तो वेश्म गहाण ठेवणार नाही किंवा भार आकारणार नाही आणि जर असे गहाण वा भार आकारण्यात आले तर, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी असे गहाण किंवा भार ज्या वाटपग्राही व्यक्तीने **फ्लॅट / वेश्म** घेतली आहे अथवा घेण्याचे मान्य केले आहे त्या वाटपग्राहीच्या हितसंबंधाला बाधा आणणार नाही.

**१६) बंधनकारक परिणाम :**

लिहून देणार / प्रवर्तक यांनी सदर करारनामा लिहून घेणार यांना निष्पादनासाठी दिले पासून **१५ दिवसाचे** आत लिहून घेणार यांनी सदर करार तसेच अदा करावयाचे रक्कमा व त्यांचे तपशिल व इतर बाबी यांची पूर्तता करून दस्त निष्पादित करून लिहून देणार यांना परत करावयाचा आहे , तसेच दस्त नोंदणी कामी लिहून देणार / प्रवर्तक सांगतील त्यावेळी , त्यादिवशी मे, सहदुय्यम निबंधक कार्यालामध्ये हजर राहून दस्त नोदंणी कार्यवाही पूर्ण करावयाची आहे. त्यानुसार जो पावेतो सदर दस्त हा मे. सह दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये नोंदणी होत नाही तो पावेतो सदर दस्ताचा अंमत सुरू होणार नाही तसेच तो पावेतो लिहून देणार व लिहून घेणार यांचे वर सदर कराराच्या अटी व शर्ती बंधनकारक होणार नाही.

जर वाटपग्राही / लिहून घेणार यांनी हा करारनामा प्राप्त झाल्याचे दिनांकापासून **१५ दिवसांचे आत** प्रवर्तकास निष्पादित करून सुपुर्द

करण्यास आणि किंवा प्रवर्तकाने जसे जसे कळविले असेल तसे तसे त्याच्या नोंदणीसाठी मे. सह दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये हजर राहण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्रवर्तक ही चुक दुरूस्ती करण्यासंबंधी वाटपग्राहीस एक नोटीस पाठवील, वाटपग्राहीस ती मिळाल्याच्या दिनांकापासून **०७ दिवसांचे आत** ती चुक दुरूस्त केली नाहीतर वाटपग्राहीचे अर्ज एकतर्फी रद्द करण्याचे हक्क लिहून देणार यांना प्राप्त राहतील त्यानुसार लिहून देणार यांनी अर्ज रद्द केल्यास लिहून देणार हे वाटपग्राहीने आरक्षित रक्कमेसह याच्याशी संबंधीत भरणा केलेल्या सर्व रक्कमा, कोणत्याही असोत त्यामधून **५% रक्कम** खर्च व नुकसान भरपाई पोटी कपात करून उर्वरीत रक्कम बिनव्याजी कोणत्याही भरपाई शिवाय परत करतील.

**१७) संपूर्ण करार :**

हा करार, त्याच्या अनुसुची परिशिष्टांसह यातील विषय वस्तुच्या संबंधातील पक्षकारांच्या संपूर्ण करार प्रस्थापीत करतो आणि यथास्थिती , उक्त **फ्लॅट / वेश्म** संबंधात पक्षकारांमधील कोणतेही व सर्व सामंजस्य करार, कोणतेही अन्य करारनामे, वाटपपत्रे, पत्रव्यवहार कोणत्याही असल्यास त्यावेळी किंवा मौखिक संव्यवस्था निष्प्रभावित करतो.

**१८) सुधारणा करण्याचा अधिकार :**

या करारामध्ये पक्षकारांच्या लेखी संमतीनेच केवळ सुधारणा करता येतील.

**१९) वाटपग्राही व्यक्ती/ उत्तरवर्ती वाटपग्राही व्यक्ती यांना या कराराच्या तरतूदी लागे असणे :**

यामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व तरतूदी व दायीत्व आणि प्रकल्पाशी संबंध या अंतर्गत उद्‌भवणारी आबंधने ( वेश्माच्या ) कोणत्याही उत्तरवर्ती वाटपग्राही व्यक्तिंना समानतेने लागू असतील आणि त्यांच्या विरूद्ध अमलात आणण्या जोग्या असतील, हस्तांतराच्या बाबतील, सर्व उद्देश व प्रयोजने याकरीत ( वेश्म) यांसहीत उक्त आंबधने असतील अशी यातील पक्षकारांना स्पष्टपणे जाणीव आहे आणि अशाप्रकारे यातील पक्षकारांकडून व त्यांच्यामध्ये मान्य करण्यात आली आहेत.

**२०) अनेकविधता:**

या कराराची कोणतीही तरतूद हा अधिनियम किंवा त्याखालील करण्यात आलेले नियम किंवा विनियम किंवा याअन्वये किंवा लागू असलेल्या इतर कायद्यान्वये शुन्यवत असल्याचे किंवा अंमलात आणण्याजोगे नसल्याचे ठरविण्यात आले असेल तर, कराराच्या अशा तरतूदी या कराराच्या प्रयोजनाशी वाजवीरित्या विसंगत नसतील तेथवर सुधारणा केल्या असल्याचे किंवा वगळण्यात आल्या असल्याचे समजण्यात येईल आणि अधिनियमाशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी व विनियमांशी किंवा यथास्थिती, लागू असलेल्या कायद्याशी सुसंगत करून काही प्रमाणात आवश्यक असतील आणि या कराराच्या उर्वरीत तरतूदी या कराराच्या निष्पादनाच्या वेळी वैध ठरतील व लागू असल्याप्रमाणे अंमलात आणण्याजोग्या असतील.

**२१) करारात जेथे उल्लेख केलेला असेल तेथे प्रमाण हिस्स्याची गणना करण्याची पद्धत :**

या करारात जेथे जेथे वाटपग्राही व्यक्तींनी प्रकल्पातील अन्य वाटपग्राही व्यक्तीशी समान कोणतेही प्रदान करणे विनिर्दिष्ट केली असेल तेथे तेथे प्रकल्पातील सर्व वेश्म यांच्या एकूण फरसबंद असलेले जे फरसबंद क्षेत्र असेल अशा क्षेत्राच्या प्रमाणात असेल.

**२२) अतिरिक्त हमी :**

दोन्ही पक्षकार मान्य करत आहेत की, या कराराच्या तरतूदी किंवा या मध्ये पूर्व कल्पीत केलेले कोणतेही व्यवहार परिणामक वाजवीरित्या

आवश्यक असल्याप्रमाणे , यामध्ये विशेषत: तरतूद करण्यात आलेले विलेख निष्पादन करतील ते अभिस्वीकृत करतील व स्वाधीन करतील आणि अशा इतर कार्यवाही करतील किंवा या अन्वये किंवा अशा कोणत्याही व्यवहारास अनुसरून या अन्वये निर्माण करावयाचे किंवा हस्तांतरीत करावयाचे कोणतेही हक्क कायम करतील किंवा ते परिपूर्ण करतील.

**२३) निष्पादनाचे ठिकाण :**

प्रवर्तक व वाटपग्राही व्यक्ती यांनी सदरचा दस्त नाशिक येथे निष्पदित केल्यानंतर त्याचवेळी उक्त कराराच्या निष्पादनासह त्याची मे. सह दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात येईल म्हणून हा करार नाशिक याठिकाणी निष्पादित करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

२४) वाटपग्राही व्यक्ती आणि किंवा प्रवर्तक नोंदणी अधिनियमात विहीत केलेल्या कालमर्यादेत नोंदणीच्या योग्य नोंदणी कार्यालयामध्ये हा करार सादर करतील आणि प्रवर्तक अशा कार्यालयात उपस्थित राहिल आणि त्याचे निष्पादन दाखल करून घेईल.

२५) या करारनुसार वाटपग्राही व्यक्ती व प्रवर्तक यांच्यावर बजावयाच्या सर्व नोटीशी या वाटपग्राही व्यक्ती किंवा प्रवर्तक यांना पाठवावयाच्या असतील तर त्या प्रस्तुतचे दस्ताचे सुरूवातीस नमूद वाटपग्राही व्यक्ती व प्रवर्तक यांचे पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने टपाल दाखला घेवून यथोचितरिरत्या बजावल्या असल्याचे मानण्यात येईल.

या कराराच्या निष्पादनानंतर पत्त्यामध्ये कोणताही बदल असल्यास तो एकमेकांना कळविणे हे वाटपग्राही व्यक्ती व प्रवर्तकाचे कर्तव्य असेल आणि त्यांनी तसे करण्यात कसूर केला तरी वरील पत्त्यावर सर्व पत्र व्यवहार आणि पत्र पोहचली नाहीतर प्रवर्तकाला किंवा वाटपग्रागही व्यक्तीला ती प्राप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

२६) संयुक्त वाटपग्राही व्यक्ती सदर करारामध्ये वाटपग्राही पैकी ज्याचे नाव पहिले दिसून येते अशा वाटपग्राही व्यक्तीशी पत्र व्यवहार करण्यात येईल, नोटीस बजावण्यात येईल आणि सर्व वाटपग्राही व्यक्तीवर योग्य रित्या पत्रव्यवहार /नोटीस बजावण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

**२७) मुद्रांक शुल्क व नोंदणी :**

**या कराराच्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी व इतर अनुषांगिक खर्च लिहून घेणार / वाटपग्राही यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे.**

**२८) विवाद ठराव :**

पक्षकारांमधील कोणताही विवाद सलोख्याने मिटवता येईल, जर विवाद सलोख्याने मिटविण्यात आला नसेल तर तो स्थावर संपदा ( विनियम व विकास ) अधिनियम २०१६ त्याखालील नियम व विनियम यांच्या तरतूदीनुसार प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करण्यात येईल.

**२९) नियामक कायदा :**

या करारनाम्यान्वये किंवा त्यातून उद्‌भवणारे, पक्षकारांचे हक्क व आंबधने यांचा अन्वयार्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या भारतीय कायद्यानुसार लावण्यात येईल आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल आणि या करारनाम्याची अधिकार करीता नाशिक न्यायालयाकडे असेल.

## परिशिष्ट – १

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी व नाशिक महानगरपालीका हद्दीतील **मौजे नाशिक ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नंबर ९८४/१/ब / २ प्लॉट क्रमांक १७/१८ यांसी क्षेत्रफळ ३५६.८८ चौ. मी. यापैकी कॉलनीरोड रूंदीकरणाचे क्षेत्र १३.५२ चौ. मी. वजा झाले नंतर शिल्लक क्षेत्र ३४३.३६ चौ. मी.** चतु:सिमा येणेप्रमाणे.

**पूर्वेस** : ७.५ मिटर कॉलनीरोड ( नियोजित ९ मिटर )
**पश्चिमेस** : प्लॉट क्रमांक ११ व १२
**दक्षिणेस** : प्लॉट क्रमांक १६
**उत्तरेस** : सर्व्हे नंबर ९८४/ ३ ब

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत जल, तरू, काष्ट, पाषाण, निधी निक्षेप, तदंगभूत वस्तुंसह तसेच जाणेयेणेचे वागवहिवाटीचे हक्कांसह असलेली दरोबस्त मिळकत.

## परिशिष्ट - २

वर परिशिष्ट १ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर '' **बद्रीनाथ हाईटस् को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक** '' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील **फ्लॅट क्रमांक** ________________ **मजला वरील यांसी अंदाजे कार्पेट क्षेत्रफळ** ____________ **चौ. मी.** यांसी मिळकतीच्या चतु:सिमा येणेप्रमाणे

**पूर्वेस** :
**पश्चिमेस** :
**दक्षिणेस** :
**उत्तरेस** :

## परिशिष्ट - क
## फ्लॅट / वेश्म मिळकतीमधील सुविधा

१) आर.सी. सी. स्ट्रक्चर व भिंती विट बांधकामात.
२) भिंतींना बाहेरून सॅन्ड फिनिश्ड प्लास्टर व सिमेन्ट पेन्ट कलर मध्ये.
३) आतील भिंतींना नेरूचे प्लास्टर
४) आत मधील सर्व भिंतींना डिस्टेंबर कलर व छताना अॅक्रेलिक कलर.
५) मुख्य दाराची चौकट लाकडी आणि बाकी सर्व दरवाजाच्या चौकट आर.सी.सी. मध्ये असतील. तसेच सर्व दरवाजे फ्लश डोअर असतील.
६) सर्व रूम मध्ये स्पारटेक टाईल्स व स्कर्टींग बसविण्यात येतील.
७) सर्व रूम मध्ये तीन ट्रॅक पावडर कोटींग अॅल्यूमिनियम स्लाईडिंग व्हिंडो, सेफ्टी ग्रील व जाळी सह बसविण्यात येतील.
८) बाथरूम मध्ये १२ X १८ मापाच्या ७ फूट कलर ग्लेझ्ड टाईल्स व टॉयलेट मध्ये ४ फूट व तळाला १२ X १२ मापाच्या स्पारटेक्स बसविण्यात येतील.
१०) किचन ओटा ग्रेनेट मार्बल टॉप आणि स्टेनलेस स्टिलचे सिंक व किचन ओट्यावर १२ X १८ खिडकीच्या लेवल पर्यंत मापाच्या ग्लेझ्ड टाईल्स बसविण्यात येतील.
११) किचन मध्ये आर.सी.सी. एक लॉफ्ट असेल.
१२) बाथरूम व संडास मध्ये जी. आय. व पी. व्ही. सी. प्लंबिंग कन्सील फिटींग करण्यात येईल. तसेच किचन, बाथरूम, संडास व वॉश बेसिनला प्रत्येकी एक नळ बसविण्यात येईल.
१३) प्रत्येक खोलीत एक दिवा पॉईंट, एक पंखा पॉईंट, लिव्हींग रूम मध्ये टि.व्ही. चा एक पॉईंट, एक प्लग पॉईंटची सोय व बाथरूम मध्ये गिझर पॉईंट परंतु गिझर देण्यात येणार नाही व संपूर्ण वायरींग कन्सील्ड फिटींग मध्ये करण्यात येईल.

१४) प्रत्येक फ्लॅट मध्ये बाथरूम , किचन व संडास मध्ये योग्य रचनेप्रमाणे एक नळ कनेक्शन व एक वॉश बेसीन.

१५) सामाईक लिफ्टची सुविधा देण्यात येईल.

## परिशिष्ट – ख

## फ्लॅट मधील सामाईक सुविधा

१) ओव्हरहेड व अंडरग्राऊंड पाण्याची टाकी सर्व फ्लॅट धारकांना सामाईक वापरासाठी करण्यात येईल. तसेच सामाईक नळकनेक्शन.

२) इमारतीच्या वर असलेली गच्ची ( टेरेस )

३) इमारती मध्ये असलेले जिने

४) बोरींग इलेक्ट्रीक मोटर सह

५) सामाईक विज कनेक्शन

६) सामाईक लिफ्टची सुविधा

येणेप्रमाणे सदरचा ॲलोटमेंट करारनामा लिहून देणार व लिहून घेणार यांनी राजीखुषीने व स्वसंतोषाने दोन साक्षीदारांच्या सह्या करून लिहून दिला व समक्ष हजर राहून त्यांचे समक्ष सह्या करून नोंदवून दिला असे.

-------------------------

**बद्रीनाथ हाईटस् को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.,**
**नाशिक तर्फे चेअरमन श्री. राजेशकुमार मोती गुप्ता**
**( लिहून देणार )**

-----------------------

**( लिहून घेणार )**

**-: साक्षीदार :-**

१)----------------- २) -----------------